गोपनीय

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
[मुंबई व उपनगर].

क्रमांक :सीकर्ण/१०८२/विक१-स्वासै,

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-२०/१०/१९८२.

विषय:-स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन वितरण करण्यापूर्वी छाननी करावयाच्या बाबी संबंधाने सूचना.

शासनाने दिनांक १-२-८२ पासून स्वातंत्र्य सैनिकांना देण्यात येणा-या स्वातंत्र्य सैनिक गौरव पेन्शन संबंधाने असलेल्या अटी ब-याचशा प्रमाणात शिथिल केल्या आणि काही नवीन सवलती देण्यासंबंधी आदेश काढले आहेत. त्यामुळे यापूर्वी ज्या स्वातंत्र्य सैनिकांची प्रकरणे उत्पन्न आणि शिक्षेचा कालावधी चार महिन्यापेक्षा कमी असल्याने पूर्वीच्या नियमानुसार नामंजूर करण्यात आली होती अशा प्रकरणांचा पुनर्विचार करण्यात येत असून त्यांना पेन्शन मंजूर करण्यात येत आहे. परंतु यामध्ये बराच कालावधी गेलेला असल्यामुळे पेन्शन वितरणा पूर्वी सर्व जिल्हाधिका-यांनी खालील बाबींची तपासणी केल्यानंतरच संबंधीत स्वातंत्र्य सैनिकाला पेन्शन अदा करण्याची खबरदारी घ्यावी.

१. अर्जदार अजून हयात असून पूर्वीच्याच ठिकाणी रहात आहेत किंवा कसे व पूर्वीचा रहाण्याचा पत्ता बदललेला असल्यास बदललेल्या ठिकाणाहून राज्यशासन पेन्शन किंवा केंद्रशासन पेन्शन घेत आहेत किंवा कसे,

२. ज्यांना राज्यशासनाचे निवृत्ती वेतन मंजूर करण्यात आले आहे त्यांना केंद्र शासनाचे निवृत्ती वेतन मिळत असल्यास राज्य शासनाचे संपूर्ण निवृत्ती वेतन न देता शासन निर्णय,क्रमांक:पीओजेस-१०८२/विक१-स्वासै,दिनांक १६-२-८२नुसार १-२-१९८२ पासून ते ३१-७-८२पर्यन्त द.म.रु.३७.५०/-प्रमाणे व शासन निर्णय,क्रमांक:पीओजेस-१०८२/विक१-स्वासै,दिनांक ०-१-४ नुसार दिनांक १-८-१९८२पासून द.म.रु.१००/- निवृत्ती वेतन देण्यात यावे.

(हिरोजगाने)
सहाय्यक सचिव,महाराष्ट्र शासन.